ICICI Group

जुलै 18, 2013

# उत्तराखंडमधील बचावकार्यासाठी आयसीआयसीआय समूहाचे 15 कोटी रुपयांचे योगदान

**डेहराडून** :उत्तराखंड मुख्यमंत्री बचावकार्य निधीत आयसीआयसीआय समूहाने आज 15 कोटी रुपयांचे योगदान केले. दूर्घटनाग्रस्त राज्याला मदत म्हणून आयसीआयसीआय बँकेच्या एमडी आणि सीईओ श्रीमती चंदा कोचर यांनी उत्तराखंडचे मुख्यमंत्री श्री. विजय बहुगुणा यांची भेट घेतली आणि त्यांना 15 कोटी रुपयांचा धनादेश सुपुर्द केला.

राज्यातील परिस्थितीविषयी प्रतिक्रिया देताना श्रीमती चंदा कोचर म्हणाल्या, " आपदग्रस्त कुटुंबिय आणि उत्तराखंडमधील अस्मानी संकटामुळे घरापासून दुरावलेल्या जनतेबद्दल आम्हाला कमालीची सहानुभूती आहे. त्यांच्या भल्यासाठी आम्ही देवाकडे प्रार्थना करत आहोत. या प्रलयात अजुनही अडकलेल्या लोकांसाठी, उत्तराखंडमध्ये पुनर्बांधणी आणि पुनर्चनेचे देशभरातून प्रयत्न सुरू आहेत. राष्ट्रबांधणीच्या कार्यात, गरजूंना मदत करण्यासाठी आमच्या उपक्रमांसह केंद्रीय आणि राज्य शासनाच्या यंत्रणांना मदत करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत."

या देणगीत – आयसीआयसीआय बँकेच्या कर्मचा-यांचे योगदान, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्स, आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इन्शुरन्स, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल एसेट मॅनेजमेंट, आयसीआयसीआय व्हेन्चुअर्स, आयसीआयसीआय सिक्युरिटीज, आयसीआयसीआय सिक्युरिटीज प्रायमरी डीलरशिप आणि आयसीआयसीआय फाऊंडेशऩ आणि त्याचसोबत कंपनीचेही योगदान आहे.

**आयसीआयसीआय समूहासंबंधी-**

वैयक्तिक बँकिंग, गुंतवणूक बँकिंग, जीवन व सामान्य विमा, व्हेंच्युअर कॅपिटल आणि मालमत्ता व्यवस्थापन या क्षेत्रात, कॉर्पोरेट आणि किरकोळ ग्राहकांना, तिच्या विशेषीकृत समूह व सहयोगी कंपन्या आणि विविध माध्यमातून, वैविध्यपूर्ण बँकिंग उत्पादने आणि वित्तीय सेवा, आयसीआसीआय समूह प्रदान करते. सशक्त ग्राहक- क्रेंद्रीत सेवेच्या माध्यमातून आयसीआसीआय समूहाने संबंधित क्षेत्रात आपले नेतृत्व नावारूपाला आणले असून ते वाढवलेही आहे.

**<u>आयसीआयसीआय बँकेंसंबंधी –</u>**

**आयसीआयसीआय** बँक (एनवायएसई : आयबीएन) ही भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठी आणि देशातील दुस-या क्रमाकांची बँक आहे. मार्च 31, 2013 अखेरीस तिची एकूण मालमत्ता युएस $ 124 बिलियन आहे. भारतासह 19 देशांत तिचे अस्तित्व आहे.

*Except for the historical information contained herein, statements in this release, which contain words or phrases such as 'will', 'would', etc., and similar expressions or variations of such expressions may constitute 'forward-looking statements'. These forward-looking statements involve a number of risks, uncertainties and other factors that could cause actual results to differ materially from those suggested by the forward-looking statements. These risks and uncertainties include, but are not limited to our ability to obtain statutory and regulatory approvals and to successfully implement our strategy, future levels of non-performing loans, our growth and expansion in business, the adequacy of our allowance for credit losses, technological implementation and changes, the actual growth in demand for banking products and services, investment income, cash flow projections, our exposure to market risks as well as other risks detailed in the reports filed by us with the United States Securities and Exchange Commission. ICICI Bank undertakes no obligation to update forward-looking statements to reflect events or circumstances after the date thereof.*

For Press Queries:
Sujit Ganguli
Head - Corporate Communications and Brand Group
ICICI Bank Ltd.
Mumbai – 51
Email – ganguli.sujit@icicibank.com